## * ऑडिट व इन्स्पेक्शन -

बँकेचे सन २०१७-२०१८ सालचे वैधानिक अंकेक्षण प्रशांत लोहीया अॅन्ड असोसिएट अकोला यांनी केले.

बँकेची सांपत्तीक स्थिती, कर्जवाटप, कर्जवसुली, थकबाकी, अंतर्गत नियंत्रण, व्यवस्थापन, ठेवी, संगणकीकरण रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार बँकेचे आर्थिक व्यवहार, सहकारी संस्था कायदा व नियम यांचे पालन इ. बाबी विचारात घेवून तसेच सहकारी परिपत्रक व गुणवत्ता परिपत्रकानुसार अंकेक्षण केले आहे. त्यांनी बँके ला 'अ' वर्ग प्रदान केला आहे. त्याबद्दल संचालक मंडळाचे वतीने आभार मानतो. अंकेक्षक यांनी अंकेक्षण अहवालात केलेल्या सूचनांचे पालन करण्यात येईल. बँकिंग रेग्युलेशन अॅक्टच्या कलम ३५ अन्वये आपल्या बँक्या ३१-०३-२०१७ च्या आर्थिक स्थितीवर रिझर्व्ह बँक अधिकारी यांनी सप्टेंबर २०१७ मध्ये तपासणी केली व त्याबाबतचा तपासणी अहवाल ऑक्टोंबर २०१७ मध्ये प्राप्त झाला. रिझर्व्ह बँक तपासणी अहवालात नमुद केलेल्या सूचनांची अंमलबजावणी बँकेने केलेली आहे.

## * संचालक मंडळ व शाखा सल्लागार समित्या -

बँकेची सर्वागिण प्रगती व्हावी यासाठी बँकेचे संचालक मंडळ व शाखा सल्लागार सदस्य नेहमी प्रयत्नशील असतात. बँकेची प्रगती करण्यामध्ये संचालक मंडळाचे सदस्य तसेच शाखा सल्लागार समिती सदस्य यांचे सहकार्य मिळाले हे सांगण्यास मला अत्यंत अभिमान वाटत आहे. संचालक मंडळाचे कामकाज संचालक मंडळ सभासदांनी एकमताने ठराव मंजूर करून बँकेच्या सर्वांगीण विकासाला मोलाचा हातभार लावला आहे. संचालकांनी तसेच शाखा सल्लागार समिती सदस्यांनी केलेल्या या बहुमोल सहकार्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

## * श्रद्धांजली -

अहवाल वर्षामध्ये बँकेचे सभासद, ग्राहक, ठेवीदार, हितचिंतक तसेच राष्ट्रीय किर्तीच्या थोर व्यक्ती पंचतत्वात विलीन झाल्या त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

## * मान्यवरांच्या भेटी व आभार -

अहवाल वर्षात बँकेला भारतीय रिझर्व बँकेच्या रिजनल डायरेक्टर सुश्री जुथिकाजी जिवानी, मा.सौ.इंद्राणी बॅनर्जी, रिझर्व बँकेचे विभागीय सरव्यवस्थापक मा.डॉ. पी.एस. व्यंकटेश्वरनजी, रिझर्व बँकेचे वरिष्ठ अधिकारी मा.श्री.राजेंद्रजी बराई, रिझर्व बँकेचे वरिष्ठ अधिकारी मा.श्री.भगत साहेब, महाराष्ट्र विधान सभेचे अध्यक्ष मा. ना.श्री. हरिभाऊजी बागडे, महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा व वैद्यकीय शिक्षणमंत्री मा.ना.श्री.गिरीशभाऊ महाजन, विदर्भ वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष मा.ना.श्री. चैनसुखजी संचेती, माजी मंत्री मा.आ.श्री.एकनाथराव खडसे, महाराष्ट्र प्रदेश भाजपाचे माजी संघटनमंत्री मा. प्रा. रवींद्रजी भुसारी, महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक फेडरेशनच्या मुख्यकार्यकारी अधिकारी मा. सौ. सायलीताई भोईर, हरिहर शक्तीपीठ औरंगाबादचे प.पू. श्री आप्पामहाराज, मा. आ. श्री. संजयजी सिरसाट (औरंगाबाद), मा. आ. श्री. प्रशांतजी बंब (गंगापूर-खुलताबाद), मा. आ. श्री. संतोषजी पाटील दानवे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाचे कुलगुरू मा.डॉ. विलासजी भाले, सुप्रसिध्द अभिनेत्री इलाक्रिती उमक यांनी बँकेस भेटी देऊन कामकाजाची माहीती घेतली व समाधान व्यक्त केले त्याबद्दल मी सर्वाचा आभारी आहे.